महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

आणि

महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना


(मान्यताप्राप्त)

यांच्यामधील

# कामगार करार

(दि.१.४.२००४ ते ३१.३.२००८)

50 Rs.




महाराष्ट्र MAHARASHTRA J46544

2 JAN 2005

[illegible] 545
[illegible]
[illegible] M.S.R.T.C.
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]

<u>समझोत्याचे संक्षेप लेख</u>

औद्योगिक विवाद अधिनियम १९४७चे कलम २ (प) सहित कलम १८(१) औद्योगिक विवाद
(मुंबई) नियम ६२ च्या अन्वये

## <u>उभयपक्षकारांची नावे</u>

| | | |
|---|---|---|
| नियोक्त्याचे (मालकाचे) प्रतिनिधी | : | डॉ. विजय सतबीर सिंघ,<br>उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ |
| कामगारांचे प्रतिनिधी | : | श्री. हनुमंत ताटे,<br>जनरल सेक्रेटरी,<br>महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना ( मान्यताप्राप्त संघटना ) |

## <u>प्रकरणाचे संक्षिप्त कथन</u>

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (व्यवस्थापन) आणि महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना ) यांच्यात दि. १६. १०. १९९९ रोजी झालेल्या कामगार कराराचा कालावधी दि. १. ४. १९९६ ते ३१. ३. २००० या चार आर्थिक वर्षांसाठी होता.

नवीन कामगार करारासाठी महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटना यांनी त्यांचे पत्र क्र. २/२००२, दि. २ जानेवारी. २००२ नसार मागण्यांचा मसदा व्यवस्थापनास सादर केला.

सदर मागणी मसुदयावर संघटनेशी चर्चा करण्यासाठी महामंडळाने ठराव क्र. २०००.०९.०८, दि.१४.९.२००० अन्वये मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली वाटाघाट समिती गठीत केली. संघटनेच्या मागणी मसुदयातील मागण्यांवर वाटाघाट समितीच्या बैठकीत मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन वाटाघाट समितीने शिफारशी केल्या. त्यावर संचालक मंडळाने ठराव क्र.२००४.०६.११,दि.१६.६.२००४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केला.

" वाटाघाट समितीने शिफारस केल्याप्रमाणे या करारापोटी ( २०००-२००४) पहिल्या वर्षाकरीता रु.३२ कोटी देण्याची शिफारस शासनास करण्यात येईल. तथापि, महामंडळाची सध्या थकबाकी देण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने ती देण्याबाबत असमर्थता व्यक्त करण्यात आली. परंतु संघटनेबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल."

तथापि, महामंडळाने देऊ केलेले रु.३२ कोटी मान्यताप्राप्त संघटनेस मान्य नसल्यामुळे संघटनेच्या विनंती वरुन दि.२८.७.२००४ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री(परिवहन), मा.मंत्री(वित्त), मा.राज्यमंत्री(परिवहन), मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ, प्रधान सचिव(वित्त), प्रधान सचिव(परिवहन) व उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रा.प.महामंडळ व संघटना प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी नवीन कामगार करारासाठी वार्षिक रु.६० कोटी देण्याचे जाहीर केले. त्यानुसार शासन पत्र क्र.एसटीसी ३४०४/सीआर ७४/परि-१, दि. २९ जुलै,२००४ अन्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

१. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कामगारांना २००४ - २००८ या कालावधीच्या कराराबाबत वार्षिक रु.६० कोटी इतकी वाढ देण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले, तसेच ही वाढ २०००-२००४ या कालावधीकरीताही मान्य करण्यात आली.
२. वार्षिक वाढ रु.६० कोटी या पैकी रु.३२ कोटींचा निधी २००४-२००८ या कालावधीसाठी महामंडळाने त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद करुन ता निधी उपलब्ध करुन दयावयाचा आहे. उर्वरीत २८ कोटींचा निधी हा शासनातर्फे प्रवासी करातून समायोजित करण्यात येईल.
३. २०००-२००४ या कालावधीकरीता जी थकबाकीची रक्कम देय होईल,त्यापैकी ५० % रक्कम मुदत ठेवीच्या स्वरुपात किमान ५ वर्षाकरीता ठेवण्यात यावी. शासनाची तसेच महामंडळाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन उर्वरीत ५० % रक्कम रोखीने देण्याबाबत कमीत-कमी दोन वर्षाचा कालावधी ठेवण्यात यावा.
४. दि.२८.७.२००४ रोजी झालेल्या बैठकीत मा.मंत्री(वित्त) यांनी महामंडळातील कर्मचारी संघटना आणि कामगारवर्ग यांनी अधिक मेहनत घेऊन महामंडळाच्या कामात सुधारण करणे तसेच उत्पादकता वाढवून महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारणे गरजेचे आहे असे आवाहन करुन येत्या आठवडयात उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून काही निकष महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याशी चर्चा करुन ठरविण्यात येतील व ते कामगार संघटनांनी स्वीकारावे असे स्पष्ट केले असता,कामगार संघटनांच्या पदाधिका-यांनी याबाबत संपूर्ण सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार निकष निश्चित करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करुन सदर निकषांचा समावेश करारामध्ये करण्यात यावा.

50 Rs.




महाराष्ट्र MAHARASHTRA

J46545

12 JAN 2005

M.S.R.T.C

५. वेतन कराराच्या संदर्भात असे आढळून आले आहे की, वेतन करार करतांना कोणताही निकष न लावता मागील करारातील रक्कमा समोर ठेवून वाटाघाटी करण्यात आलेल्या आहेत. या पुढे अशा प्रकारची पध्दत न अवलंबता काही निकष आणि उत्पादकता यांची सांगड घालून महामंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन याबाबत विचार करण्यात यावा. कारण शासनास महामंडळाला यापुढे कराराच्या संदर्भात आर्थिक मदत देणे शक्य होणार नाही. त्या दृष्टीकोनातून करार करतांना विचार करुन अशा प्रकारची तरतूद करारात करण्यात यावी.

६. २०००-२००४ या वर्षाकरीता रु.६० कोटी वार्षिक या प्रमाणे येणारा खर्च हा २००४-२००५ पासून पुढील कालावधीच्या प्रवासी करातून समायोजित करावयाचा असल्याने, प्रवासी कराचे उत्पन्न शासनास अधिक मिळणे आवश्यक आहे. या करीता भारमान वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा त्या दृष्टीने आपण आवश्यक ती उपाययोजना करावी व शासनास अधिक प्रवासी कर प्राप्त होईल या दृष्टीने प्रयत्न करावेत.

७. सदर करारामध्ये प्रशासकीय बाबी / प्रशासकीय अधिकार यांचा समावेश करण्यात येऊ नये.

शासन पत्र क्र.एसटीसी/३४०४/सीआर ७४/ परि-१दि.२३.८.२००४ अन्वये खालील प्रमाणे निदेश दिले आहेत.

१) कराराची मुदत संपण्यापूर्वी किमान एक वर्ष अगोदर पुढील कराराच्या वाटाघाटी सुरु कराव्यात.

1944

शासन पत्र क्र.एसटीसी/३४०४/सीआर १४२/ परि-१ दि.६.१.२००५ अन्वये खालील प्रमाणे अतिरिक्त निदेश दिलेले आहेत.

१. २००० ते २००४ आणि २००४ ते २००८ या कालावधीचे दोन (२) वेतन करार करण्यात यावेत.

२. मागिल कराराच्या प्रथेप्रमाणे वाटाघाट समितीने चर्चा करून मान्य केलेल्या इतर बाबींच्या मागण्यांचा समावेश असलेला करार महामंडळाचे पातळीवर स्वतंत्रपणे करावा. त्याचा आर्थिक भार शासनावर पडणार नसल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

३. शासनाची मान्यता फक्त रू.६० कोटी प्रत्येक वर्षात वाढ देण्यापुरतीच आहे व प्रशासकीय बाबीच्या बाबतीत शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही व ती पुर्ण करण्याची जबाबदारी शासन स्वीकारू शकत नाही असा करारात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

४. महामंडळाने विविध कामासाठी उत्पादकतेचे निकष कामगार प्रतिनिधीशी चर्चा करून ठरवावेत व त्याचा समावेश करारात करावा. हे जर आता शक्य होत नसेल तर २ महिन्यांच्या कालावधीत स्वतंत्रपणे करार करण्यात यावा.

वाटाघाट समितीने मान्यताप्राप्त संघटनेशी त्यांच्या मागणी मसुदयावर चर्चा करुन केलेल्या शिफारशी व उपरोक्त शासन पत्रातील सूचना विचारात घेऊन उभयपक्षी समझोता करण्यात आला.

-----------

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| १ | समझोत्याचा कालावधी | हा समझोता खालील कालावधीसाठी राहील.<br>दि. १.४.२००४ ते दि. ३१.३.२००८ |
| २ | **वैयक्तीक भत्ता** | सन २०००-२००४ च्या कामगार करारातील कलम-२ नुसार देय असलेला वैयक्तीक भत्ता त्याच दराने रोजंदार गट-१ व २ सह सर्व कर्मचा-यांना दि. १.४.२००४ पासून पुढे दि. ३१.३.२००८ पर्यन्त देय राहील.<br><br>दि. १.४.२००४ रोजी कार्यरत असणा-या अंशकालीन कर्मचा-यांना ते ज्या प्रवर्गात काम करतात, त्या वेतनश्रेणीत मूळ वेतन दराने उपरोक्त वैयक्तीक भत्ता अनुज्ञेय होईल. मात्र सदरची रक्कम त्यांना प्रशासनाने विहित केलेल्या त्यांच्या कामाच्या तासाच्या प्रमाणात अनुज्ञेय होईल.<br><br>सदरचा भत्ता दि. १.४.२००४ नंतर दि. ३१.३.२००८ पर्यंत सेवेत येणा-या कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या नियुक्तीच्या मूळ वेतना प्रमाणे व नियुक्तीच्या तारखेपासून देय राहील.<br><br>कराराच्या कालावधीत मूळ वेतनात वाढ झाली तरी वैयक्तीक भत्त्यामध्ये अनुषंगीक वाढ होणार नाही. तो स्थिर राहील.<br><br>सदरचा भत्ता जानेवारी, २००५ पेड इन फेब्रुवारी, २००५ च्या वेतनापासून अदा करण्यात येईल. |
| ३ | करारापोटी देय होणारी थकबाकी | दि. १.४.२००४ ते ३१.१२.२००४ या नऊ (९) महिन्यांची थकबाकी रक्कमेतून परिपत्रक क्र. राप/लेखा/सामान्य-१/ ८/४१८८, दि. ९.११.२००४ अन्वये अदा करण्यात आलेल्या रू. २१००/- रक्कमेची एकरकमी वसूली करण्यात येईल व उर्वरीत रक्कम समान पाच (५) हप्त्यात जानेवारी, २००५ पेड इन फेब्रुवारी, २००५ पासून मे, २००५ पेड इन जून, २००५ पर्यन्त अदा करण्यात येईल. |
| ४ | जे कर्मचारी दि. ३१.३.२००० नंतर त्यांच्या वेतनवाढीमुळे वेतनश्रेणीच्या अंतीम टप्प्यावर अथवा पुढे गेल्याने ज्यांच्या वेतनवाढी कुंठीत झाल्या आहेत त्यांना वेतनवाढीच्या शेवटच्या दराने दरवर्षी वार्षिक वेतनवाढ देण्यात यावी. | १९९६-२००० च्या करारातील तरतुदीच्या धर्तीवर जे कर्मचारी दि. १.४.२००४ रोजी किंवा त्यानंतर वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर अथवा कमाल टप्प्याच्या पुढे पोहोचतील ते देखील त्यांच्या वेतनवाढीच्या शेवटच्या दराने दरवर्षी तदर्थ वेतनवाढीस दि. ३१.३.२००८ पर्यन्त पात्र राहतील. |
| ५ | कनिष्ठ वेतनश्रेणी लागू असणा-या कर्मचा-यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे चालनीय भत्ते देण्यात यावेत. | कनिष्ठ वेतनश्रेणीवर काम करणा-या कर्मचा-यांना इतर कर्मचा-यांना देय असलेल्या दराप्रमाणे चालनीय भत्ते दि. १.४.२००४ पासून देण्यात येतील. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| ६ | **हजेरी प्रोत्साहन भत्ता** | चालक, वाहक व आगारातील कार्यशाळा कामगारांसाठी दि. २५ एप्रिल ते १२ जून तसेच विभागीय कार्यशाळेसाठी १२ फेब्रुवारी ते ३१ मार्च असा हजेरी प्रोत्साहन भत्त्यासाठी हंगामाचा कालावधी राहील. सदरचा भत्ता जोडपत्र-अ मध्ये दर्शविल्या प्रमाणे दि. १.४.२००४ पासून देण्यात येईल.<br>सदरची योजना रोजंदार गट-१ व २ मधील कर्मचा-यांनाही लागू राहील. |
| ७ | **रात्रवस्ती भत्ता** | चालक वाहकांना खालील प्रमाणे रात्रवस्ती भत्ता दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल.<br><u>ठिकाण</u><br>सर्वसाधारण - रु. ७.५०<br>जिल्हा - रू. ९.५०<br>विर्निदिष्ट - रू. १२.०० |
| ८ | **रात्र वाहतूक सेवा भत्ता** | रात्र वाहतूक सेवा भत्ता प्रत्येक रात्रीसाठी रू.८.०० या दराने दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. सदर भत्ता अदा करण्यासाठीच्या शर्ती सध्या असल्याप्रमाणे म्हणजे परिपत्रक क्र.एसटी/पीडी/ ६२/ एनएस/३/ ७०, दि. ३.९.१९७० नुसार असतील. |
| ९ | **धुलाई भत्ता** | अ) जे कर्मचारी सुती गणवेश मिळण्यास पात्र आहेत अशा कर्मचाऱ्यांना सुती गणवेषासाठी दरमहा रू.१०.०० या दराने धुलाई भत्ता दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल.<br>ब) वूलन गणवेषासाठी सध्याच्या रू.१५.०० वार्षिक दराने व वूलन जर्सीसाठी रू. १०.०० वार्षिक दराने धुलाई भत्ता दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १० | **रात्रपाळी भत्ता** | जेथे कर्मचा-यांना २१.०० वाजल्यापासून ०६.०० वाजेपर्यन्त किमान तीन तास काम करावे लागेल तेथे अशा कर्मचाऱ्यांना प्रती रात्रपाळी कामासाठी सध्याच्याच रु.०७.०० या दराने व २१.०० वाजल्यापासून ०६.०० वाजेपर्यन्त किमान ५.०० तास काम करावे लागते अशा कर्मचाऱ्यांना रू.९.५० या दराने रात्रपाळी भत्ता दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल.<br>शिवाजीनगर(पुणे) व म.का.मुंबई येथे अतिथ्यालयात रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या खानसामा / परिचारक यांना वरील प्रमाणे रात्रपाळी भत्ता दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| ११ | **खोळंबा व अधिक काळ मुक्कामासाठी रात्रवस्ती भत्ता** | जेथे नियत कर्तव्यामुळे चालक-वाहकांना रात्रवस्तीच्या ठिकाणी तेथे पोहोचण्याच्या वेळेपासून १८ तास किंवा त्यापेक्षा अधिक अखंड मुक्काम करणे आवश्यक ठरते अशा ठिकाणासाठी खालील प्रमाणे खोळंबा भत्ता ( रात्रवस्ती भत्ता) दि. १.४.२००४ पासून अदा करण्यात येईल.<br>**ठिकाण** — **दर**<br>सर्वसाधारण — रू. ८.००<br>जिल्हा — रू. ९.००<br>विर्निदिष्ट — रू.१०.५० |
| १२ | **पार्सल भत्ता** | वाहकांना ज्या दिवशी पार्सले घेऊन जावे लागेल त्या दिवशी त्यांना रू.३.०० या दराने पार्सल भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १३ | **टपाल भत्ता** | वाहकांना ज्या दिवशी टपालाच्या थैल्या घेऊन जावे लागेल त्यादिवशी त्यांना रू.३.०० प्रति दिन या दराने टपाल भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १४ | **शिलाई भत्ता** | सुती गणवेषाच्या शिलाईसाठी दर संचास रू.२०.०० या दराने शिलाई भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १५ | **विशेष भत्ता**<br>(खानसामा व अतिथ्यालय परिचर) | खानसामा व अतिथ्यालय परिचर यांना रू.७५.०० दरमहा या दराने विशेष भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १६ | **बिघाड दुरुस्ती भत्ता** | बिघाड दुरुस्ती भत्ता रू.७.०० या दराने दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १७ | **रोकड हाताळणी भत्ता** | मध्यवर्ती कार्यालय, प्रादेशिक कार्यालय, विभागीय कार्यालय, मध्यवर्ती कार्यशाळा येथील रोखपालास रू.५०/- दर महा या दराने रोकड हाताळणी भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल. |
| १८ | **रोकड भत्ता** | रोकड हाताळणारे कारकून / आरक्षण वाहतूक नियंत्रक/ रोकड हाताळणारे वाहतूक नियंत्रक यांना दरमहा खालील प्रमाणे रोकड भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल.<br>इमान विम्याची रक्कम — दर<br>रू. ५०००/- — रू.४०/-<br>रू.१०,०००/- — रू.४५/-<br>रू.१५,०००/- — रू.६०/- |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| १९ | **विना वाहक सेवा भत्ता :** | विनावाहक सेवेवर काम करणाऱ्या चालकांना खालील प्रमाणे विना वाहक सेवा भत्ता दि.१.४.२००४ पासून अदा करण्यात येईल.<br>१) व्हॉल्वो / ए.सी.बसेस -- रू.२०/- प्रति नियत<br>२) निम आराम, आराम, हिलक्स -- रू.१५/- प्रति नियत<br>३) साधी बस -- रू.१०/- प्रति नियत |
| २० | **महागाई भत्ता :**<br>दि.१.४.२००४ पासून सुधारीत वेतनश्रेणी वरील काम करीत असलेल्या वर्ग तीन व चार पदातील सर्व कर्मचा-यांना वेळोवेळच्या केंद्र शासकीय दरानुसार त्यांचे मूळ वेतन असल्यास विशेष वेतन तसेच वैयक्तीक वेतन यांच्या बेरजेच्या रक्कमेवर महागाई भत्ता देण्यात यावा. | तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यांना राज्य शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला दर व सूचनांनुसार महागाई भत्ता दिला जाईल. |
| २१ | **घरभाडे व स्थानिक पुरक भत्ता:**<br>केंद्र शासनाने वेळावेळी निश्चित वेळावेळी निश्चित केलेल्या नियम व दरानुसार घरभाडे व स्थानिक पुरक भत्ते सर्व कर्मचा-यांना अदा करण्यात यावेत. | मागिल कामगार करारात मान्य केल्याप्रमाणे राज्य शासनाने विहीत केलेल्या अटी, नियम व दरानुसार रा.प.कर्मचा-यास घरभाडे भत्ता व स्थानिक पुरक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| २२ | **आदिवासी भत्ता :**<br>शासनाचे निर्णयाप्रमाणे संवेदनाशील भागात कार्यरत असणा-या कर्मचा-यांसही शासनाप्रमाणे सुविधा व भत्ता अदा करण्यात यावा. | या विषयीच्या राज्य शासनाच्या निकषाप्रमाणे कर्मचारी पात्र ठरत असतील तर आदिवासी भत्ता अदा केला जाईल. मात्र या व्यतिरिक्त इतर भत्ता व सुविधा देय होणार नाहीत. |
| २३ | दि.१.४.१९८० पासूनच्या करारा नुसार १२ वर्षानंतर प्रशासकीय कर्मचा-यांना व कारागिर "क" पदातील कर्मचा-यास निवडदर्जा देण्याची तरतूद आहे. त्या ऐवजी ८ वर्षानंतर निवडदर्जा देण्यात यावा. | सध्या प्रशासकीय कर्मचारी, वाहतूक कर्मचारी, कारागिर "क" व प्रमुख कारागिर यांना १२ वर्षांनी जे श्रेणीकरण केले जाते, त्या ऐवजी १० वर्षांनी श्रेणीकरण देण्यात येईल. तसेच चालक प्रवर्गालाही १२ वर्षांनी मिळणारी निवडश्रेणी १० वर्षांनी देण्यात येईल. |
| २४ | सर्व रा.प.कर्मचा-यांना शासनाप्रमाणे ३०० दिवस रजा साठविण्याची मुभा देण्यात यावी. | प्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणेच इतर सर्व कर्मचा-यांची अर्जित रजा साठविण्याची कमाल मर्यादा २४० दिवसांऐवजी ३०० दिवस राहील. |
| २५ | कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास खास रजा देतांना कायम वेतनश्रेणीची अट लावली जाते. ती रद्द करून रा.प.मधील रोजंदार गट क्र.१ व २ व अंशकालीन कर्मचा-यांना देण्यात यावी. | मागील कामगार करारातील कलम-९४ अन्वये एखादया पुरुष/महिला कर्मचा-याला किंवा त्याच्या पत्नीने/पतीने कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली असल्यास अशा कर्मचा-याला राज्य शासनाच्या कर्मचा-यांप्रमाणे कुटूंब नियोजन सवलतींचे फायदे देण्याचे मान्य केलेले आहे. सदरची सवलत रोजंदार गट-१ व २ वरील कर्मचा-यांनाही लागू करण्यात येईल. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| २६ | मृत्यू फंडाची रक्कम दुप्पट करण्यात यावी. | मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबिताना आर्थिक सहाय्य देण्याची योजना यापुढेही चालू राहील. सदर योजनेसाठी प्रत्येक कर्मचाऱ्याच्या वेतनातून दि.१.४.२००४ पासून रु.२५/- ऐवजी रू.४०/- द.म.कपात करण्यात येतील व त्यामध्ये महामंडळ दरवर्षी रु.१ कोटी ऐवजी रू.१ कोटी ५० लाख इतका निधी देईल. |
| २७ | लिफ्टमन पदामध्ये काम करीत असलेल्या कर्मचा-यास प्रतिवर्षी एक बूट जोड देण्यात यावा. | लिफ्टमन पदामध्ये काम करीत असलेल्या कर्मचा-यास प्रतिवर्षी एक जोड बूट देण्याचे मान्य करण्यात आले. |
| २८ | सर्व पदातील कर्मचारी कामगिरीवर असताना अपघातात जखमी झाल्यास औषध उपचारासाठी रु.१०,०००/- उचल मिळावी. | कामगिरीवर असतांना जखमी झाल्यास सर्व कर्मचा-यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रु.१०,०००/- पर्यन्त वसूलीप्राप्त अग्रीम देण्यात येईल. |
| २९ | नेत्र तपासणीत चालक अपात्र ठरल्यानंतर पर्यायी नोकरीत घेतल्यावर त्याचे चालक पदावरील वेतन संरक्षित करण्यात यावे. | दृष्टीतिक्षणता चाचणीत चालक अपात्र ठरल्याने पर्यायी नोकरीत घेतल्यास त्याचे पूर्वीचे वेतन संरक्षित करण्यात येईल मात्र ज्या पदामध्ये पर्यायी नोकरी दिली आहे,त्या पदाचीच वेतनश्रेणी दिली जाईल. |
| ३० | **<u>उत्पादकतेचे निकष</u>**<br>शासन पत्र क्र.एसटीसी/३४०४/सीआर-१४२/परि-१,दि.६.१.२००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे **आर्थिक करारावर** स्वाक्षरी झाल्यापासून महामंडळाने विविध कामासाठी उत्पादकतेचे निकष मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन दोन महिन्याच्या आत ठरवावेत व त्यासाठी स्वतंत्र करार करावा असे निदेश दिले आहेत. यास अनुसरुन प्रस्तुत करार स्वाक्षरीत झालेल्या तारखे पासून दोन महिन्याच्या आंत **उत्पादकतेशी निगडीत निकष** मान्यताप्राप्त संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन निश्चित केले जातील व करार स्वाक्षरीत केला जाईल. जर संबंधीत पक्षकारांमध्ये याबाबत सहमती झाली नाही तर परिवहन आयुक्त,महाराष्ट्र शासन निकष निश्चित करतील व त्यांचा निर्णय उभयपक्षांना मान्य राहील. | |
| ३१ | नैसर्गिक आपत्ती, पुरग्रस्त, भूकंप,जाळपोळ अशा प्रकारच्या अनेक नैसर्गिक आपत्ती आल्यास रा.प.सर्व कर्मचा-यांना (अंशकालीन कर्मचा-यासह ) त्याला मिळत असणा-या ३ महिन्याचा पूर्ण पगार विना जामीन विना अट तातडीने मदत म्हणून देण्यात यावी. | नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या कर्मचा-यांना तीन महिन्याचा मूळ पगार अधिक महागाई भत्ता एवढा अग्रीम मंजूर करण्यात येईल व तो सहा महिन्यात वसूल करण्यात येईल. नैसर्गिक आपत्तीत पूर/ वादळ /भूकंप /आग/ वीज कोसळणे आणि अतिवृष्टी इत्यादीचा अंतर्भाव राहील. |
| ३२ | मान्यताप्राप्त संघटनेस देण्यात आलेल्या कार्यालयाचे भाडे रद्द करुन सदरचे कार्यालय मोफत वापरण्यास परवानगी देण्यात यावी. | मान्यताप्राप्त संघटनेस देण्यात आलेल्या कार्यालयाच्या सध्याच्या भाडयामध्ये १० % सवलत देण्यात येईल. |
| ३३ | सर्वच रोजंदार,अर्धवेळ ,कनिष्ठ वेतनश्रेणीतील व मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी येथील कर्मचा-यांना समय वेतन श्रेणीवर विना अट घेण्यात यावे. | सध्या असलेल्या अर्धवेळ कर्मचा-यांना समय वेतन श्रेणीवर घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्यात येईल. |

| मागणी क्रमांक | मागणी | समझोता |
|---|---|---|
| ३४ | १९९६-२००० च्या करारानुसार अनुज्ञेय असलेला संरक्षित महागाई भत्ता रु.२२२/- हा पदातील व कामाचे ठिकाणाच्या बदलामुळे अनुज्ञेय ठरत नाही ही अट रद्द करण्यात यावी. कारण हा संरक्षित महागाई भत्ता वेतनाशी निगडीत असून पदाशी निगडीत नाही. तसेच जेथे विशेष वेतन अनुज्ञेय आहे,तेथे कर्मचा-याची बदली/ बढती होईल त्या वेळी तो अनुज्ञेय राहील. | १९९६-२००० च्या करारानुसार अनुज्ञेय असलेला संरक्षित महागाई भत्ता रु.२२२/- तो कर्मचारी २० % विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी कार्यरत असे पर्यन्त देय राहील. तसेच अशा कर्मचा-यांची बदली २० % विशेष वेतन अनुज्ञेय नसलेल्या कामाच्या ठिकाणी झाली तर त्यांना सदरचा संरक्षित महागाई भत्ता देय होणार नाही. मात्र अशा कर्मचा-याच्या बदली पुन्हा २० % विशेष वेतन अनुज्ञेय आहे अशा कामाच्या ठिकाणी झाली तर त्यांना पूर्वी मिळत असलेला संरक्षित महागाई भत्ता रु.२२२/- देय होईल. तसेच संरक्षित महागाई भत्ता रु.२२२/- अनुज्ञेय असलेल्या कर्मचा-यांना नियमित / तात्पुरती बढती दिल्यास व या बढतीच्या पदास अनुज्ञेय असल्यास, त्यांना सदरचा संरक्षित महागाई भत्ता मिळण्यास ते कर्मचारी २०% विशेष वेतन अनुज्ञेय असलेल्या कामाच्या ठिकाणी कार्यरत असे पर्यन्त देय राहील. |
| ३५ | अपघात झाल्यास अपघातग्रस्त चालकाला जामीन न्यायालयाचा, वकीलाचा सर्व खर्च रा.प.महामंडळाने करावा. | चालक नियोजित कर्तव्यावर असतांना त्यांच्याकडून अपघात झाल्यास व संबंधीतावर न्यायालयात खटला दाखल झाल्यास सध्याच्या रु.१५००/- ऐवजी रु.२०००/- अग्रीम देण्यात येईल. त्याची वसूली रु.२००/- प्रमाणे समान १० हप्त्यात करण्यात येईल. तसेच अशा अपघाताच्या वेळी चालकास ज्या प्रमाणे पोलिस स्टेशनमध्ये व्यवस्थापनातर्फे जामीन दिला जातो,त्याच धर्तीवर न्यायालयामध्येही महामंडळातर्फे जामीन देण्यात येईल. |
| ३६ | **सर्वसाधारण** | १. हा समझोता मान्यताप्राप्त संघटनेने सादर केलेल्या मागणी मसुद्यातील सर्व मागण्याचे पूर्ण व अंतिम समाधान करणारा आहे असे मानण्यात येईल.<br>२. हा समझोता महामंडळ व राज्य सरकार यांच्या मान्यतेच्या अधिन राहील.<br>३. या समझोत्याच्या अटीचा अर्थ लावण्याबाबत विवाद निर्माण झाला तर त्याबाबत महामंडळ संबंधीत पक्षकारांचे म्हणणे ऐकून निर्णय घेईल. तो निर्णय अंतिम असेल.<br>४. अन्यतः इतर खंडामध्ये स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर सदर समझोता, समझोत्यावर सहया केल्याच्या तारखेपासून अंमलात येईल. |

५. १९९६-२००० व २०००-२००४ च्या करारातील आर्थिक लाभ/सवलती/तरतूदी या करारान्वये सुधारल्या अथवा वगळल्या असतील,त्या सोडून इतर तरतूदी सर्वसाधारणपणे पुढे चालू राहतील.

६. या करारात समाविष्ट असणा-या सर्व बाबींबाबत कराराच्या कालावधीत कोणत्याही मागण्या केल्या जाणार नाहीत. तसेच कराराच्या कालावधीत संपावर जाणे/ मंदगतीने काम/लेखणीबंद आंदोलन/ उपोषण /धरणे/ घेराव इत्यादी मार्गाचा अवलंब करणार नाहीत. याशिवाय अनधिकृत अनुपस्थिती, महामंडळाच्या मालमत्तेचे नुकसान, हिंसाचार, घातपात, काम थांबणे अशा प्रकारच्या व इतर बेकायदेशीर कृत्यामध्ये मान्यताप्राप्त संघटना भाग घेणार नाही किंवा प्रोत्साहन देणार नाही किंवा ते कृत्य माफ करण्याकरीता पूढाकार घेणार नाही.

७. या करारांतर्गत मिळणारे आर्थिक लाभ दि.३१.३.२००८ पर्यन्तच मिळतील. दि.१.४.२००८ पुर्वी नवीन कामगार करार अस्तित्वात येईल. त्यासाठी उभयपक्षी वाटाघाटी एक वर्ष अगोदर सूरू करण्यात येईल.

८. या करारासाठी वार्षिक वाढ रु.६० कोटी इतक्या रक्कमेपर्यन्त मर्यादीत राहील. त्यापैकी शासनाचा हिस्सा रक्कम रु.२८ कोटींची वार्षिक तजवीज केवळ शासनास देय होणा-या प्रवासी कराच्या रक्कमेतूनच समायोजन करून अदा करण्यात येईल.

९. कराराच्या कालावधीत वार्षिक रू ६० कोटी मर्यादेत खर्च होत आहे हे पाहण्याची जबाबदारी लेखा खात्याची राहील.

| | | |
|---|---|---|
| | | १०. वाटाघाट समितीने चर्चा करून मान्य केलेल्या इतर बाबींच्या मागण्यांचा समावेश असलेला करार महामंडळाचे पातळीवर स्वतंत्रपणे करण्यात येईल. त्याचा आर्थिक भार शासनावर पडणार नसल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. |

साक्षीदार

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी व त्याच्यावतीने

महाव्यवस्थापक (क. व औ. सं)

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कामगारांच्या वतीने मान्यताप्राप्त संघटनेचे प्रतिनिधी

अध्यक्ष,
महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटना

जनरल सेक्रेटरी,
महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटना

ठिकाण- मुंबई
दिनांक - १९.०१.२००५

## जोडपत्र - अ

## हंगामाच्या कालावधीसाठी चालक,वाहक व कार्यशाळा कामगारांसाठी सुधारीत उपस्थिती प्रोत्साहन योजना

**हंगामाच्या कालावधी**

**चालक, वाहक व आगार कार्यशाळेसाठी - दि.२५ एप्रिल ते १२ जून ( दोन्ही दिवस धरून)**

**विभागीय कार्यशाळा कामगारांसाठी - दि.१२ फेब्रुवारी ते ३१ मार्च ( दोन्ही दिवस धरून)**

| अ.क्र. | प्रत्यक्ष कामाचे दिवस | चालक,मुख्य कारागीर, कारागीर 'क' | वाहक ,सहाय्यक कारागीर, सहाय्यक, स्वच्छक |
|---|---|---|---|
| | | **रक्कम रुपये** | **रक्कम रुपये** |
| १. | ४२ | १५० | ११३ |
| २. | ४१ | १३८ | १०० |
| ३. | ४० | १२५ | ८८ |
| ४. | ३९ | ११३ | ७५ |
| ५. | ३८ | १०० | ६३ |
| ६. | ३७ | ८८ | ५० |
| ७. | ३६ आणि त्यापेक्षा कमी | **काही नाही** | **काही नाही** |

**टिपा :**

१) या उपस्थिती प्रोत्साहन योजनेमध्ये फक्त ५ दिवसांपर्यन्तची गैरहजेरी मान्य करण्यात येईल व सदरहू कालावधीमध्ये ३७ दिवसांपेक्षा कमी दिवस हजर राहणा-या कामगारांना सदर बक्षिसाची रक्कम मिळणार नाही.

२) खाते वाहन चालकांना (स्टाफ कार चालक) ज्यांच्याकडे पी.एस.व्ही. बॅच नसेल त्यांना सदर प्रोत्साहन बक्षिसाची रक्कम मिळणार नाही.

३) वरील कालावधीमध्ये निलंबित केलेल्या कर्मचा-यांना सदर प्रोत्साहन बक्षिसाची रक्कम मिळणार नाही.

४) चालक/वाहकाने त्यांच्या प्रत्यक्ष बस चालन/वाहक कामाएवेजी प्रशासकीय कारणास्तव त्यांना इतर कामासाठी वापरले असेल तर त्यांना सदर बक्षिसाची रक्कम वरील योजनेनुसार मिळेल.